# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४०३/२०२३ दिनांक – २४/११/२०२३

## पत्नीच्या प्रियकराला चाकुने भोकसुन मागील १ वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस अटक - वालीव पोलस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

दिनांक १३/०९/२०२२ रोजी सकाळी ११.१५ वा. चे सुमारास ज्ञानदिप शाळेच्या बाजुला, शिवाजी नगर, वसई पुर्वता.वसई जि.पालघर येथे फिर्यादी नामे शैलेंद्र महेंद्रकुमार सिंग वय २८ वर्ष व्यवसाय- नोकरी रा. सत्यनारायण मंदिराजवळ गौराईपाडा वसई पुर्व ता. वसई जि पालघर हे संगिता हीचे सोबत फोन वर बोलत असताना तिचे घरी हवाईपाडा टेकडी, गौराईपाडा, वसई पुर्व, जि. पालघर येथे गेले असता संगिता हीचे पति नामे श्रवणकुमार मौर्या यांनी फिर्यादी व संगिताचे प्रेम असल्याचा राग मनात धरुन चाकुने फिर्यादीचे पोटात दोन वेळा भोकसुन फिर्यादीला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फियादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे गु.र.नं.३९६/२०२२ भा.द.वि.सं.कलम ३०७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.सदर गुन्हातील आरापीत हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे यांनी पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकास सुचना दिल्या.

वरीष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त माहीतीचे आधारे आरोपी नामे श्रवणकुमार विश्वनाथ मौर्या, वय ३६ वर्षे, धंदा- नोकरी, रा. गाव- मालपुर उसरपुर्वा, पोस्ट दाडीराम, थाना मडीहान, जि. मिर्झापुर, उत्तरप्रदेश हा बिलालपाडा, नालासोपारा पुर्व येथे येणार असल्याची गुप्त माहीती मिळाली होती. सदर माहीतीच्या अनुषंगाने बिलालपाडा परीसरात सापळा रचुन पाळत ठेवली. आरोपी सदर ठिकाणी आला असता त्यास ताब्यात घेतले. तो मागील १ वर्षापासुन मार्झापुर, उत्तरप्रदेश व जागेश्वरी, मुंबई व वेळोवेळी जागा बदलुन इतर ठिकाणी आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई श्रीमती पोंणिमा श्रींगी - चौगुले, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सैय्यद जिलानी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.ह. मुकेश पवार, मनोज मोरे, सचिन दोरकर, पो.शि. अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या केली आहे.